आयुक्त कार्यालय
सोलापूर महानगरपालिका
इंद्रभुवन, रेल्वे लाईन, सोलापूर.४१३००१
दुरध्वनी -०२१७-२७४०३००
जा.क्र./नआ/वै/७१०
दि.३० डिसेंबर २०२१

# आदेश

**विषय: ३१ डिसेंबर २०२१ वर्ष अखेर व नूतन वर्षारंभ, २०२२ मार्गदर्शक सूचना.**
**संदर्भ:**

१) भारतीय साथ रोग अधिनियम १८९७.
२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ६५ (१) (ब)
३) महाराष्ट्र शासन सार्व.आरोग्य विभागाकडील अधिसूचना क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि.१४ मार्च २०२०.
४) क्रमांक: डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१/ महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक २७/११/२०२१ रोजीचे आदेश.
५) क्रमांक: डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१/ महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक २४/१२/२०२१ रोजीचे आदेश.
६) महाराष्ट्र शासन गृह विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील क्र.आरएलपी-१२२१/प्र.क्र.२८१/विशा १ब दि.२९/१२/२०२१.

ज्याअर्थी कोरोना विषाणूच्या संक्रमणाच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांमध्ये "ओमिक्रॉन" ही नवीन विषाणू प्रजाती आढळून आल्यामुळे संसर्गाचा नवीन धोका निर्माण झाला आहे. या ओमिक्रॉन विषाणू प्रजातीचे संक्रमण सामान्य नागरिकांमध्ये / रहिवाशांमध्ये फार मोठ्या तीव्रतेने पसरण्याची दाट शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आरोग्याच्या दृष्टिने खबरदारी म्हणून मोठ्या प्रमाणात एकत्र न येता या वर्षी ३१ डिसेंबर २०२१ (वर्ष अखेर) व नूतन वर्ष २०२२ चे स्वागत अत्यंत साधेपणाने करणे अपेक्षित आहे. यानुषंगाने गृह विभाग यांनी वरील संदर्भ क्र.६ अन्वये ३१ डिसेंबर २०२१ (वर्ष अखेर) व नूतन वर्ष २०२२ चे स्वागत करणेबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

ज्याअर्थी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र दि.१४ मार्च, २०२० अन्वये कोरोना विषाणू (काव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे, आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून, महानगरपालिका आयुक्त हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोविड -१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

त्याअर्थी, मी पि.शिवशंकर,भा.प्र.से., आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कोरोना (कोविड-१९) विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाकडील प्राप्त निर्देशास अनुसरुन सोलापूर शहर हद्दीत सार्वजनिक हिताच्या दृष्टिने यावर्षी सुध्दा खबरदारीचा उपाय म्हणून ३१ डिसेंबर २०२१ (वर्ष अखेर) व नूतन वर्ष २०२२ चे स्वागत करणेकामी खालील सूचना / आदेश निर्गमित करीत आहे.

१. कोरोनाच्या अनुषंगाने दिनांक ३१ डिसेंबर २०२१ रोजी व दिनांक ०१ जानेवारी २०२२ रोजी नववर्ष स्वागताच्या निमित्ताने नागरिकांनी घराबाहेर न पडता नववर्षाचे स्वागत शक्यतोवर घरीच साधेपणाने साजरे करावे.
२. मदत व पुर्नवसन विभाग मंत्रालय मुंबई यांच्या उपरोक्त दिनांक २४/१२/२०२१ रोजीच्या आदेशान्वये राज्यात दिनांक २५ डिसेंबर २०२१ पासून रात्री ०९.०० ते सकाळी ०६.०० वाजेपर्यंत ५ पेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येण्यावर बंदी घालण्यात आली आहे, सदर आदेशाचे पालन करण्यात यावे.
३. कोविड १९ च्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाचे परिपत्रक क्र.डीएमयू/२०२०/सीआर-९२/डीआयएसएम-१ दि.२७/११/२०२१ अन्वये देण्यात आलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे. तसेच शासन आदेश मदत पुनर्वसन व विभाग, मंत्रालय मुंबई क्र.डीएमयू/२०२०/सीआर-९२/डीआयएसएम-१ दि.२४/१२/२०२१ अन्वये देण्यात आलेल्या सूचनांचे तंतोंतत पालन करावे.
४. दिनांक ३१ डिसेंबर २०२१ व नूतन वर्ष २०२२ चे स्वागताकरिता आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांना बंदिस्त सभागृहात उपलब्ध आसनक्षमतेच्या ५०% पर्यंत तर खुल्या जागेत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांना उपलब्ध क्षमतेच्या २५% च्या मर्यादेत उपस्थित राहणेस परवानगी असेल.
५. सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारे गर्दी होणार नाही व Social Distancing राखले जाईल तसेच मास्क व सॅनिटायझरचा वापर होईल याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. तसेच त्या ठिकाणी निर्जंतूकीकरण व्यवस्था करण्यात यावी.
६. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ६० वर्षावरील नागरिकांनी व १० वर्षाखालील मुलांनी सुरक्षिततेच्या व आरोग्याच्या दृष्टिने घराबाहेर जाणे टाळावे.
७. ३१ डिसेंबरच्या दिवशी नागरिकांनी बागेत, रस्त्यावर अशा सार्वजनिक ठिकाणी मोठ्या संख्येने येऊन गर्दी न करता, सोशल डिस्टन्सींग (सामाजिक अंतर) राहील तसेच मास्क व सॅनिटायझरचा वापर होईल याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. **(परंतू शहरात दिनांक २५ डिसेंबर २०२१ पासून रात्री ०९.०० ते सकाळी ०६.०० वाजेपर्यंत ५ पेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येण्यावर बंदी घालण्यात आली आहे, सदर आदेशाचे पालन करण्यात यावे.)**
८. नववर्षाचा स्वागताच्या निमित्ताने कोणत्याही प्रकारे धार्मिक / सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करु नये तसेच मिरवणूका काढण्यात येऊ नयेत.
९. नूतन वर्षाच्या पहिल्या दिवशी बहुसंख्य नागरिक धार्मिक स्थळी जात असतात. अशावेळी त्या ठिकाणी एकाच वेळी गर्दी न करता सोशल डिस्टन्सींगचे पालन करावे. संबंधीतांनी आरोग्य व स्वच्छतेच्या दृष्टिकोनातून योग्य त्या खबरदारीच्या उपाययोजना कराव्यात.
१०. फटाक्यांची आतिषबाजी करण्यात येऊ नये, ध्वनीप्रदुषणाच्या अनुषंगाने नियमांचे काटेकोरपणे पालन व्हावे.
११. कोविड १९ व विशेषत्वाने ओमिक्रॉन या विषाणू प्रजातीच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या नगरविकास विभाग, मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच संबंधीत महानगरपालिका, पोलीस, स्थानिक प्रशासन यांनी विहीत केलेल्या नियमांचे काटेकोरपणे अनुपालन करणे बंधनकारक राहील.
१२. तसेच या परिपत्रकानंतर ३१ डिसेंबर २०२१ व नूतन वर्ष २०२२ सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत काही सूचना नव्याने प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती / संस्था अथवा संघटना यांचेवर भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ मधील तरतूदीनुसार दंडनीय / कायदेशीर कारवाईस पात्र असून आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, साथ रोग नियंत्रण कायद्यातील तरतूदी आणि इतर कायदे आणि विनियम यानुसार कारवाई करणेत येईल. अशा व्यक्ती, संस्था अथवा संघटना यांचे विरुध्द संबंधीत पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी / विभागीय अधिकारी व अधिनस्त कर्मचारी यांनी कारवाई करावी.

**सदरचा आदेश आज रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.**

स्थळ :- सोलापूर
दिनांक:- ३०/१२/२०२१

SOLAPUR MUNICIPAL COMMISSIONER OFFICE

**( पि.शिवशंकर, भा.प्र.से.)**
**आयुक्त,**
**सोलापूर महानगरपालिका.**

प्रति,
१) अति.आयुक्त, सो.म.पा.
२) सर्व उपायुक्त, सो.म.पा.
३) सर्व सहा.आयुक्त, सो.म.पा.
४) सर्व वैद्यकीय अधिकारी / मुख्य वैद्यकीय अधिकारी सो.म.पा.
५) सर्व वरिष्ठ पोलिस निरीक्षक, शहर हद्दीतील सर्व पोलिस ठाणे, सोलापूर.
६) सर्व खाते / शाखा प्रमुख, सोलापूर महानगरपालिका.
७) महानगरपालिका हद्दीतील सर्व शासकीय कार्यालय प्रमुख

प्रत :- माहितीस्तव सादर..
१) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे
२) मा.जिल्हाधिकारी,सोलापूर
३) मा.पोलीस आयुक्त,सोलापूर

प्रत :- जनसंपर्क अधिकारी,
सदरचा आदेशाची माहिती सर्व नागरिकांना होणेसाठी त्यास व्यापक प्रसिध्दी देणेत यावी.